R.No.MAHMAR/25/A3029

# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990




लातूर वर्ष ५ वे अंक ९६ मंगळवार दि.२१ ऑक्टोंबर २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## विश्वरत्न,भारतरत्न प.पु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे ३० ऑक्टोबर रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते अनावरण

**स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक २०२५ आणि भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुर्णाकृती पुतळा अनावरण सोहळा पूर्वतयारी व आढावा बैठक**

उदगीर : येत्या काळात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होणार असून ज्या कार्यकर्त्यांनी दिवसरात्र एक करून पक्षासाठी मेहनत घेतली त्यांना न्याय देण्याची ही निवडणूक असून मागील काळात केलेल्या विकास कामाच्या जोरावर आपण जनतेसमोर जाऊन मत रुपी आशीर्वाद मागणार असून येत्या सर्व स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवणुका जिंकु असा विश्वास माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केला आहे. ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आयोजीत स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक २०२५ व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा अनावरण सोहळा पूर्व तयारी आढावा बैठकीप्रसंगी अध्यक्ष पदावरून बोलत होते.



विश्वरत्न प.पु. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा भव्य पुर्णाकृती उभारावा अशी गेल्या अनेक दशकापासुनची समाजबांधवांची मागणी होती. त्यांच्या मागणीचा विचार करुन विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा भव्य - दिव्य पुतळ्याचे येत्या ३० ऑक्टोबरला राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी देशाचे नेते शरदचंद्रजी पवार धर्मशाळेचे लोकार्पण, विश्वशांती बुध्द विहाराच्या परिसरात सुशोभिकरण त्यानंतर उद्यानाचे भुमीपुजन आणि गव्हाण ते चाकुर या हॅम २ च्या सिमेंट रोडचा भुमीपुजन सोहळा संपन्न होणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमास मतदार संघातील सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहनही आ.संजय बनसोडे यांनी यावेळी केले आहे. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अफसर शेख, प्रदेश सरचिटणीस ॲड.व्यंकट बेद्रे, प्रा.अंकुश नाडे, भरत चामले, बाबासाहेब काळे पाटील, रामराव राठोड, चंदन पाटील नागरगोजे, समीर शेख, प्रा.श्याम डावळे, तालुकाध्यक्ष बालाजी भोसले पाटील, ता.कार्याध्यक्ष वसंत पाटील, शहराध्यक्ष सय्यद जानीमियाँ, कार्याध्यक्ष शशिकांत बनसोडे, माजी उपसभापती बाळासाहेब मरलापल्ले, जळकोटचे सभापती विठ्ठल चव्हाण, जळकोट राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष संग्राम हासुळे पाटील, प्रदेश सचिव इम्तियाज शेख, अभिजित औटे, शफी शेख, प्रदीप जोंधळे, ज्ञानेश्वर बिरादार, अनिल मुदाळे,खाजा तांबोळी, सुनिल केंद्रे, महेश बिरादार, रवीप्रभा खादीवाले, दिपाली औटे, मधुमती कणशेट्टे , वैशाली कांबळे, ॲड. वर्षा कांबळे, हुस्नाबानो शेख, काजल मिरजगावे, सिमा नेत्रगावकर, वर्षा बनसोडे, मंदा पुणेकर, माया कांबळे, आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आ.संजय बनसोडे यांनी, येत्या काळात नगर परिषद, महानगर पालिका, जिल्हा परिषद , पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या निवडणुका आहेत पक्षातील वरिष्ठांच्या आदेशाने ज्या ज्या कार्यकर्त्यांनी माझ्यासाठी काम केले. त्यांना न्याय देण्यासाठी मी सदैव त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असून पुढचे तीन महिने आपण सर्वजण खुप कष्ट करुन स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका जिंकू व पक्षश्रेष्ठीने जो आदेश आपल्या सर्वांना देतील तो अंतिम समजून काम करु असे सांगितले. यावेळी येत्या निवडणुकीत ईच्छुक असणाऱ्या उमेदवारांनी पक्षश्रेष्ठी समोर आपणास उमेदवारी मिळावी म्हणून इच्छा व्यक्त केली. यावेळी ग्रामीण व शहरातील पक्षाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार; वानवडी पोलिसांकडून सहा जण गजाआड

पुणे : कोंबड्यांची झुंज लावून त्यावर जुगार खेळण्याचा प्रकार वानवडी पोलिसांनी उघडकीस आणला. घोरपडीतील एम्प्रेस गार्डनपासून काही अंतरावर मोकळ्या जागेत कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार खेळला जात होता.

वानवडी पोलिसांनी कारवाई करून या प्रकरणी सहा जणांना अटक केली. आरोपींकडून झुंजीसाठी वापरण्यात आलेले सहा कोंबडे, पाच मोबाइल संच, तीन दुचाकी, पिशव्या, दोन हजार ५८० रुपये असा पाच लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अमोल सदाशिव खुर्द (वय ४७, रा. रविवार पेठ), मंगेश आप्पा चव्हाण (वय ५५, रा. भवानी पेठ), निखिल मनीष त्रिभुवन (वय २०), अमीर आयूब खान (वय २८, दोघे, रा. घोरपडी), सचिन सदाशिव कांबळे (वय ४२, रा. भवानी पेठ), प्रणेश गणेश पॅरम (वय २७, रा. लष्कर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

याप्रकरणी सहा आरोपींविरुद्ध महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदा, तसेच प्राण्यांना क्रूरतेने वागणूक देणे अधिनियम कलम ११ (इ), (न) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घोरपडीतील एम्प्रेस गार्डन परिसरातील एका बंगल्याजवळ असलेल्या मोकळ्या जागेत कोबड्यांची झुंज लावून त्यावर जुगार खेळण्यात येत असल्याची माहिती वानवडी पोलीस ठाण्याच्या तपास पथकातील पोलीस कर्मचारी गोपळ मदने आणि अमोल पिलाणे यांना मिळाली. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने तेथे कारवाई केली. त्यावेळी तेथे कोंबड्यांच्या झुंजीवर जुगार खेळण्यात येत असल्याचे दिसून आले. आरोपी कोंबड्यांची झुंज बघण्यासाठी आलेल्या काही जणांना पैसे लावण्यास सांगत होते. पोलिसांनी सहा जणांना अटक केली.






## संपादकीय

# भारताचे खंबीर तेल धोरण

कोणतीही गोष्ट वारंवार सांगितली, तर ती खरी वाटू लागते, यावर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा ठाम विश्वास असावा. त्यामुळे भारत आणि पाकिस्तान यांच्यातील युद्ध मी थांबवले, असे धादांत असत्य कथन ते पुन्हा पुन्हा करत असतात. एवढेच नव्हे, तर जगातील इतर अनेक युद्धे मीच समाप्त केली, असाही दावा ते करत असतात. आता भारत रशियाकडून तेल खरेदी करणे थांबवेल, असे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्याचा दावा ट्रम्प यांनी केला आहे; मात्र ट्रम्प आणि मोदी यांच्यात कोणताही संवाद झाला नसल्याचा खुलासा भारताने लागलीच केला.

ऊर्जा स्रोतांचा विस्तार करणे आणि बाजारातील मागणी पूर्ण करण्यासाठी योग्य ते विविधीकरण करण्याचे भारताचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी तेल खरेदीचे अन्य पर्याय उपलब्ध असल्याचे भारताने स्पष्ट केले आहे. सामान्यतः दोन देशांतील राष्ट्रप्रमुख परस्परांमधील औपचारिक चर्चेचा तपशील देताना त्यात अचूकता आणि सत्यता असेल, याची खबरदारी घेतात; परंतु मोदी हे आपले जवळचे मित्र असल्याचे ट्रम्प यांनी अनेकदा म्हटले आहे आणि त्याचवेळी त्यांच्या नावाने खोट्या बाबीही जाहीर केल्या आहेत. खरे तर, आज भारताची आर्थिक व सामरिक शक्ती वाढली आहे. अशावेळी भारताबद्दल चुकीच्या गोष्टी पसरवणे, मोदी यांच्या नावाने बोगस दावे करणे, हे ट्रम्प यांनी टाळायला हवे. 'भारत रशियाकडून तेल खरेदी करत असल्याबद्दल अमेरिका खूश नाही. यामुळे युक्रेन युद्धात रशियाला आर्थिक मदत झाली.

या युद्धात चार वर्षांत दीड लाख नागरिक मारले गेले', असे ट्रम्प यांनी म्हटले आहे. वास्तविक कोणत्या देशातून कोणती वस्तू घ्यायची, याचा निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य त्या त्या देशांना असते. ज्या देशातून तेल स्वस्त मिळेल, तिथून ते घेण्याचा भारताला संपूर्ण अधिकार आहे. तसेच भारताने रशियाकडून तेल घेतल्यामुळे त्या पैशाचा उपयोग करून रशिया शस्त्रास्त्रे घेऊन युक्रेनींची कत्तल करतो, हा युक्तिवाद अजबच आहे. तो खरा मानायचा, तर अमेरिकेच्या लष्करी मदतीचा दुरुपयोग करून पाकिस्तान भारतात दहशतवादी कृत्ये करते, असे म्हणावे लागेल. अशावेळी भारताने अमेरिकेवर बहिष्कार टाकायचा का? अमेरिकेने जगात ठिकठिकाणी हस्तक्षेप केला आहे. अशावेळी जगाने अमेरिकेवर बहिष्कार टाकल्यास, ते चालेल का? परंतु, महासत्ता असल्यामुळे आपल्याला सर्व माफ आहे, असे अमेरिकेला वाटत असेल; मात्र भारत तेल आणि नैसर्गिक वायूचा एक महत्त्वाचा आयातदार आहे.

अस्थिर ऊर्जा परिस्थितीत भारतीय ग्राहकांच्या हिताचे रक्षण करणे यालाच सरकारचे प्राधान्य राहिले आहे, असे परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी म्हटले आहे. एकाच ठिकाणाहून तेल खरेदी करण्याऐवजी ती वेगवेगळ्या देशांमधून करणे हे अधिक फायद्याचे असते. युक्रेन युद्धास आरंभ झाल्यानंतर तेल निर्यातदार देशांनी युरोपीय देशांना पुरवठा करण्याकडे रोख वळवला. अशावेळी भारताने तुलनेने स्वस्त रशियन तेल विकत घेण्यास सुरुवात केली. रशियावर आर्थिक बंधने लादली असूनही युरोपीय महासंघाने रशियाशी २०२३ मध्ये १७ अब्ज युरोंचा व २०२४ मध्ये ६७ अब्ज युरोंचा व्यापार केला. एवढेच नव्हे, तर रशियाकडून अमेरिकाही युरेनियम, खते, रसायने खरेदी करते. मग, ते कसे चालते, असा सवाल पत्रकार परिषदेत विचारण्यात आल्यावर 'मला त्याची माहिती नाही, मला ते तपासून पाहावे लागेल', अशी उडवाउडवीची उत्तरे ट्रम्प यांनी दिली होती.

भारत हाही ब्राझील, रशिया, चीन व दक्षिण आफ्रिकेप्रमाणे 'ब्रिक्स'चा संस्थापक देश आहे. ब्रिक्सचा आर्थिक प्रभाव वाढत असून, ब्रिक्ससाठी डॉलरला पर्यायी असे आंतरराष्ट्रीय चलन असावे, अशी कल्पना रशियाचे अध्यक्ष पुतीन यांनी मांडली आहे. तसे घडल्यास भविष्यात जगावरील अमेरिकेचे वर्चस्व कमी होईल. डॉलरला पर्यायी चलन खपवून घेणार नाही, अशी दमबाजी ट्रम्प यांनी यापूर्वीच केली आहे. या पार्श्वभूमीवर ब्राझीलप्रमाणेच भारतावरही अमेरिकेने जादा कर लावले. २०२४–२५ मध्ये भारताने रशियाकडून एकूण आयातीच्या ३६ टक्के, म्हणजे ८७ दशलक्ष टन तेल आयात केले. जून २०२४ मध्ये तर हे प्रमाण ४३ टक्क्यांवर गेले. भारत इराक, सौदी अरेबिया व संयुक्त अरब अमिरातीकडून तेल खरेदी करतो.

चीनही रशियाकडून बरेच तेल विकत घेतो. मे महिन्यानंतर भारताने रशियाकडून प्रतिदिन १.९६ दशलक्ष बॅरल अशी विक्रमी आयात केली. एकूण आयातीच्या ६ टक्के कोळसाही भारत रशियाकडून घेत असतो. रशियन तेलामुळे एका वर्षात भारताने २२ हजार कोटी रुपयांची बचत केल्याचे एका अहवालात म्हटले आहे. २०२१–२२ मध्ये भारत केवळ २.१ टक्के तेल रशियाकडून घेत होता. त्याचे प्रमाण आपण कित्येक पट वाढवत नेले. रशिया व अन्य वेगवेगळ्या देशांतून तेल खरेदी करून, आयात तेलाची 'वेटेड व्हरेज कॉस्ट' बॅरलला किमान दोन डॉलरने कमी करण्यात भारत यशस्वी झाला आहे.

भारत कदाचित रशियाकडून केल्या जाणाऱ्या तेल खरेदीत तत्काळ कपात करू शकणार नाही; मात्र ही प्रक्रिया सुरू झालेली आहे, असे वक्तव्य करून ट्रम्प यांनी किंचित सौम्य भूमिकाही घेतली आहे. अमेरिकेने ५० टक्के शुल्क लावूनही आजवर भारत अमेरिकेच्या दबावाखाली आलेला नाही. सप्टेंबर महिन्यातही भारताने रशियाकडून प्रतिदिन १६ लाख बॅरल्स तेलाची आयात केली. १० ऑक्टोबरला तर हे प्रमाण १८ लाख बॅरल्सवर जाऊन पोहोचले; मात्र त्याचवेळी भारत अमेरिकेस करत असलेल्या निर्यातीत १२ टक्के घट झाली आहे. अशावेळी रशियाकडून तेल खरेदी करण्यात होणारी बचत आणि अमेरिकेने लादलेल्या करांमुळे निर्यातीला बसलेला फटका यांचा तुलनात्मक अभ्यास करून भारताने आपले तेल खरेदीचे धोरण सुनिश्चित केले पाहिजे. शेवटी भारत अमेरिकेकडूनही तेल खरेदी वाढवू शकतो. भावनिक विचार न करता आर्थिक हिताला प्राधान्य देऊनच भारताने तेल खरेदीबाबतचे धोरण ठरवले पाहिजे.

# कराड कुटूंबियातील तिसऱ्या पिढीने जोपासला समर्थपणे वारसा



जनहित, लोककल्याणकारी अशा विविध वैचारिक आणि चांगल्या विचाराच्या व्यक्तीच्या सहवासात आल्यास निश्चितपणे आयुष्याला वेगळीच कलाटणी मिळते. परिसाच्या सहवासात लोखंड आले तरी त्या लोखंडाचे भाग्य उजळून निघते. असाच प्रत्यय शैक्षणिक, सांस्कृतिक, वैद्यकिय, सामाजिक आणि अध्यात्मिक या चारही क्षेत्रात मोठे योगदान असलेले विश्वधर्मी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांच्या सहवासात आल्याने अनेकांच्या जीवनाची रेखाच बदलून गेली.

प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांचे कार्यकर्तृत्व तासन तास सांगितले तरीही वेळ अपुरा पडेल. कितीही लिहिले तरी कागद कमी पडतील एवढे मोठे कार्य आहे. त्यांच्या भगीनी पूर्णब्रम्हयोगीनी त्यागमुर्ती प्रयागआक्का कराड यांच्या शिकवणीतून जे काही करायचे त्यात इतरांना आधार मिळाला पाहिजे, लोककल्याणाचे कार्य घडले पाहिजे या विचारातून त्यांनी रामेश्वर (रूई) पासून ते संपूर्ण देशभर काम केले. आपल्या निस्वार्थी कार्यपद्धतीने स्वतःचा वेगळा ठसा निर्माण केला. विविध क्षेत्रात दीपस्तंभ प्रमाणे कार्य करणारे प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांच्या सहवासातून, प्रेरणेतून अनेकांना नवी दिशा मिळाली. प्रा. डॉ विश्वनाथजी कराड साहेब यांच्यासह जेष्ठ बंधू वारकरी सांप्रदायातील हभप श्री. तुळशीरामआण्णा कराड आणि प्रगतशील शेतकरी श्री. काशीरामनाना कराड यांनीही प्रयागआक्कांच्या सामाजीक कार्याचा वारसा विविध कार्यातून सातत्याने पुढे घेवून जाण्याचा प्रयत्न केला.

वर्षानुवर्ष अडचणीत, संकटात सापडलेल्या काळ्या आईची सेवा करणाऱ्या शेतकऱ्यांना मदत करता यावी त्यांच्या डोळ्यातील अश्रूपुसून अल्पसा का होईना आधार देता यावा यासाठी प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कराड कुटुंबीयांनी लातूर तालुक्यातील रामेश्वर जवळा परिसरातील ओसाड माळरानावर श्री संत गोपाळ बुवा महाराज शुगर अँड अँग्रो इंडस्ट्रीजच्या माध्यमातून साखर कारखाना उभा केला. कारखान्याचे चेअरमन श्री. राजेशजी कराड यांनी बारकाईने स्वतःहा लक्ष देवून अत्यंत काटकसरीने नियोजन करून या कारखान्याची उभारणी केली. विजयादशमीच्या दिवशी ऊसाची मोळी टाकून गळीत हंगामाचा शुभारंभ केला तेंव्हापासून आज तागायत शेतकऱ्यांच्या ऊस गाळपाचा अखंड यज्ञ सुरू आहे हे ऊस उत्पादक शेतकऱ्यांसाठी खूप दिलासादायक आहे.



साखर कारखाना सुरू झाल्याने स्वतः च्या पोटची खळगी भरण्यासाठी विविध स्वप्न उराशी बाळगून अनेक ऊस तोड कामगाराचे कुटुंब ऊसाच्या फडात ऊस तोडणीच्या कामाला लागले आहेत. जगण्यासाठी काम केल्याशिवाय पर्याय नाही त्याशिवाय लेकरा बाळांचे हित होणार नाही या भावनेतून कामाला आलेल्या ऊसतोड कामगाराच्या जीवनात दिवाळी सण काय? दिवाळी ऊसाच्याच फडात, ईतराप्रमाणे त्यांना सुट्टी नसते, नवे कपडे तर दूरच, गोड धोड करून खाने अवघडच.....

कराड कुटुंबीयात सुन म्हणून आलेल्या सौ. शुभांगी राजेशजी कराड यांनी प्रयागआक्का यांच्याकडून अखंड अन्नदानाचा मिळालेला वारसा आणि प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब यांच्या सामाजिक कार्याची प्रेरणा घेऊन ऊसतोड कामगारांच्या कुटुंबीयांना दिवाळीत दिवाळीचा अल्पसा का होईना आनंद देता यावा यासाठी ऊसतोड कामगारांना ज्या ठिकाणी काम सुरू आहे अशा ऊसाच्या फडात जाऊन प्रत्येक कुटुंबीयांना पुरेल एवढा दिवाळीचा फराळ देण्याची संकल्पना मनात आणली. आणि त्या दृष्टीने फराळ तयार करणे असेल त्याची पॅकिंग असेल ही कामे लागलीच आपल्या सहकाऱ्यांना सोबत घेवून झपाट्याने त्या करू लागल्या.



ऐन दिवाळीत सणाची लगबग असतानाही श्रीसंत गोपाळबूवा महाराज शुगर अँड अँग्रो इंडस्ट्रीज या साखर कारखान्याच्या चालू गळीत हंगामातील ऊस तोडणीच्या कामावर असलेल्या त्या त्या गाव शिवारातील ऊसाच्या फडावर जाऊन कारखान्याचे मुख्य प्रर्वतक हभप श्री. तुळशीरामआण्णा कराड आणि प्रगतशील शेतकरी श्री. काशीरामनाना कराड, सौ. शुभांगीताई राजेश कराड, रणवीर कराड, बन्सीभाऊ भिसे, गोपाळ पाटील, शाम वाघमारे यांच्यासह इतर अनेककांनी ऊस तोड महिला पूरूष कामगारांची भेट घेवून अस्थेवाइक पणे संवाद साधून चर्चा केली आणि प्रत्येक व्यक्तीस चारकप्याच्या भल्यामोठया स्टीलच्या पॅकिंग केलेल्या डब्बयातून मिठाइचे वाटप केले. सदरील मिठाई मिळताच ऊस तोड कामगारा बरोबराच त्यांच्या सोबत असलेल्या लहान बालकांच्या चेहऱ्यावर आनंद ओसांडून वाहत होता. शिवाय पोटाची खळगी भरण्यासाठी प्रत्यक्ष काम करणाऱ्या ऊस तोड कामगारांना दिवाळी फराळाचे वाटप करत असताना सौ. शुभांगीताई कराड यांनाही आत्मिक समाधान मिळत असल्याचे दिसून येत होते.

त्यागमुर्ती प्रयागआक्का कराड आणि प्रा. डॉ. विश्वनाथजी कराड साहेब वारकरी सांप्रदायातील हभप श्री. तुळशीरामआण्णा कराड आणि प्रगतशील शेतकरी श्री. काशीरामनाना कराड यांच्याकडून ज्यांचा सण ऊसाच्या फडात, कष्ट करण्यात असतो अशा कुटुंबीयांना दिवाळीचा आनंदही देता यावा ही प्रेरणा सौ. शुभांगीताई राजेश कराड यांच्या मनात यावी यातच खूप काही आहे. प्रा. डॉ विश्वनाथजी कराड साहेब यांच्यामुळे कराड कुटुंबीयातील आ. रमेशआप्पा कराड यांच्यासह प्रत्येकजण आपापल्या पद्धतीने आवडीनुसार दरवर्षी होणारे उत्सव – सण विविध उपक्रमासह सामाजिक, अध्यात्मिक, शैक्षणिक कार्य करीत आहेत. आध्यात्मिक क्षेत्राला प्रोत्साहन देण्यासाठी आणि वारकरी सांप्रदाय वाढविण्यासाठी रमेशआप्पांनी शेकडो भजनी मंडळांना साहित्याचे वाटप केले. प्रयागआक्का यांच्या कडून मिळालेला समाजहिताचा वारसा प्रा. डॉ विश्वनाथजी कराड साहेब यांनी पुढच्या पिढीला दिला आणि कराड कुंटूबातील तिसऱ्या पिढीनेही तेवढ्याच सक्षमपणे पुढे चालवण्याचा प्रयत्न करत आहेत. खरंच कराड कुटुंबीयांचे करावे तेवढे कौतुक कमी आहे. शुभांगी वहिणीच्या ऊसतोड कामगारांना दिलासा देणाऱ्या दिवाळी कार्यक्रमाच्या निमित्ताने कराड कुटुंबीयांच्या हातून सतत समाज हिताची कार्य घडावीत हीच परमेश्वरचरणी प्रार्थना...

**********

चंद्रकांत कातळे, रेणापूर

# भारताने रशियाकडून तेल खरेदी करू नये हे अमेरिका ठरविणारा कोण?

आंतरराष्ट्रीय संबंध कसे टिकवायचे आणि कोणासोबत टिकवून ठेवायचे याची जाणीव भारताला चांगल्याप्रकारे ग्यात आहे.त्यामुळे डोनाल्ड ट्रम्प यांनी भारताला कोणत्याही प्रकारचा आंतरराष्ट्रीय सल्ला देवू नये.अमेरिकेला जर चांगला सल्ला पाहिजे असेल तर त्यांनी भारताजवळुन घ्यावा त्याचे भलेच होईल.ट्रम्प म्हणाले की ब्रेकिंग न्यूज देऊ का?भारत रशियाचे तेल घेणे थांबवणार! परंतु असे काहीच नाही.कारण डोनाल्ड ट्रम्प यांचे दररोज देशांतर्गत किंवा विदेशांतर्गत विवादास्पद आणि बिनबुडाचे बयान येत असतात यात काही नवीन नाही किंवा तथ्य नाही.त्याच पध्दतीचा भारत–रशिया तेल धोरणाबद्दल ट्रम्प स्वतःची पाठ थोपटणारे वक्तव्य केले आहे.जगातील अनेक देशांना कल्पना आहे की अमेरिका केव्हा व कधीही कोणालाही धोका देवू शकतो.त्यामुळे आजच्या परिस्थितीत अमेरिका व खासकरून डोनाल्ड ट्रम्प विश्वास पात्र रहाले नाही.जगाला कल्पना आहे की नोबेल शांती पुरस्कार मिळावा यासाठी ट्रम्प प्रत्येक देशाच्या दारोदारी फिरत होते व मला नोबेल पुरस्कार मिळावा यासाठी संपूर्ण शक्तीनिशी दबावतंत्राचा वापर करीत होते.परंतु संपूर्ण प्रयत्न निष्फळ ठरले.नोबेल पुरस्कार मिळावा यासाठी ट्रम्प पाकिस्तानसमोर झुकले सुध्दा.परंतु नोबेल शांती पुरस्कारांपासून डोनाल्ड ट्रम्पला कोसो दूर फेकल्या गेले. अशाप्रकारे ट्रम्पची पुरस्काराची कथा,प्रथा,व्यथा संपूर्ण जगाने उघड्या डोळ्यांनी पहाली आणि त्यांच्या आशा आकांक्षा संपूर्ण धुळीस मिळाल्या.कोणताही पुरस्कार असो मागावा लागत नाही, मिळवावा लागतो यासाठी त्या पध्दतीची प्रतीमा तयार करावी लागते व मेहनत करावी लागते आणि कोणताही पुरस्कार हे मेहनतीचे फळ असते.ज्यांचे नाव कधी चर्चेत नव्हते त्या दक्षिण अमेरिका खंडातील व्हेनेझुएलामध्ये लोकशाहीला प्रोत्साहन आणि हुकुमशाहीच्या विरोधात लढण्यासाठी विरोधी पक्षनेत्या मारिया कोरिना मचाडो यांना २०२५ चा शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर झाला.मारिया कोरिना मचाडोला हा मिळालेला पुरस्कार त्यांच्या कर्तृत्वाच्या कामगिरीवर मिळाला आहे आणि नोबेल पुरस्काराच्या शर्यतीत धावणाऱ्या ट्रम्पची हवा गुल होऊन चारोकोणे चीत झाले. त्यामुळे डोनाल्ड ट्रम्पच्या कोणत्याही वक्तव्याकडे किंवा भाष्याकडे भारतासह कोणताही देश बारकाईने लक्ष देत नाही. रशिया व भारत असा देश आहे की जसा शब्द देतो तसा पाळतो सुध्दा आणि दिलेला प्रत्येक शब्द काळ्यापाटीवरील पांढरी रेष असते.त्यामुळे भारताने तेल रशिया जवळुन खरेदी करावे की नाही ही भारत–रशियाची विदेश निती ठरवित असते.त्यामुळे रशियाच्या बाबतीत अमेरिकेने कितीही दबाव तंत्राचा वापर केला तरी भारत–रशिया संबंध यत्किंचितही डगमगणार नाही ही बाब ट्रम्पने लक्षात ठेवली पाहिजे. कारण संपूर्ण जगाला चांगल्याप्रकारे ग्यात आहे की ट्रम्प काय आहे. ट्रम्पच्या अनेक चुकीच्या निर्णयामुळे अमेरिका अडचणीत आला आहे व डोनाल्ड ट्रम्प स्वतःच्या स्वार्थासाठी अनेक देशांना धोका देऊन त्यांना रक्ताच्या लाथोळ्यात सोडले याचे अनेक उदाहरण जगापुढे आहेत. अमेरिकेतील विदेशी नागरिकांनी ट्रम्पच्या विरोधात जात आहे याचे जिवंत उदाहरण म्हणजे डोनाल्ड ट्रम्प प्रशासनाने नव्या एच १बी व्हिसा फीचे शुल्क एक लाख डॉलर (सुमारे ८८ लाख रुपये) इतके वाढविल्याच्या निर्णयावर यूएस चेंबर ऑफ कॉमर्सने कोलंबिया येथील न्यायालयात सरकारविरोधात खटला दाखल केला आहे.यावरून स्पष्ट होते की ट्रम्प प्रशासनाचा निर्णय दिशाहीन असून बेकायदेशीर आणि मनमानीवाला आहे,असा दावा याचिकेत केला आहे आणि ही बाब सत्य आहे.अशाच चुकीच्या निर्णयाची पुनरावृत्ती भारत–रशिया संबंधांच्या बाबतीत ट्रम्प करीत आहे. युक्रेन–रशिया युध्द संपविण्याच्या उद्देशाने डोनाल्ट ट्रम्प म्हणतात, भारत आता रशियाकडून तेल खरेदी करणार नाही असे आश्वासन भारताचे पंतप्रधान व माझे मित्र नरेंद्र मोदी यांनी मला दिले असल्याचा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी १५ आक्टोंबरला केला.खरे पहाले तर भारताने अशा पद्धतीचे कोणतेही पाऊल उचलले नाही आणि उचलणार सुध्दा नाही.कारण भारताने रशियाला व रशियाने भारताला अनेक संकटकाळीन परिस्थितीत दोघांनी एकमेकांना मदत व सहाय्यता केली आहे आणि अमेरिकेचा विचार केला तर अमेरिकेने नेहमीच पाकिस्तानला मदत करून भारताच्या पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केले आहे.त्यामुळे डोनाल्ड ट्रम्पच्या वक्तव्यावरून स्पष्ट लक्षात येते की त्यांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे.आंतराष्ट्रीय बाजारात रशियाचे तेल आजही सर्वात स्वस्त, किफायतशीर आहे आणि रशियाचे भारतासोबतचे ऊर्जा संबंध हे भारताच्या राष्ट्रीय हिताशी सुसंगत आहेत. जागतिक बाजारात रशियापुढे अमेरिकेने अनेक अडथळे आणले गेले परंतु त्यांना न जुमानता, रशियाने सातत्याने बांधिलकी जपली.तसेच पर्यायी पुरवठा साखळी व पेमेंट सिस्टीममध्ये देखील लवचिकता दाखविली.रशियासारखे धाडस अमेरिकेत अजीबात नाही ही बाब स्पष्ट दिसून येते. ट्रम्पच्या वक्तव्यानंतर भारताची रशियातून तेल खरेदी जोमाने वाढली असून अमेरिकेच्या धमक्यांचा तेल खरेदीवर तिळमात्र परिणाम आलेला नाही.सध्याच्या परिस्थितीत अमेरिकेने फसव्या योजनांना सुरूवात केली आहे यात पॅलेस्टाईन– इजरायल संघर्ष ट्रम्प यांची फसवी योजना असल्याचे दिसून येते.त्याचप्रमाणे रशियाच्या तेलावरून भारताच्या बाबतीत ट्रम्पने टाकलेला तेल बॉम्ब फुस्सी निघाल्याचे स्पष्ट दिसून येते.

**********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

# सागरी सामर्थ्यात भारत आघाडीवर

आता शक्तिसंतुलन केवळ हवाई आणि पायदळापुरतीच मर्यादित राहिलेले नाही. जागतिक राजकारण आणि आर्थिक हिताची पाळेमुळे महासागराच्या खोलीतही व्यापली आहेत. म्हणूनच जगभरातील देश नौदलाच्या आधुनिकीकरणावर भर देत आहेत. भारतही त्यापासून अपवाद राहिलेला नाही. एकीकडे चीनकडून सागरी हद्दीत घुसखोरी करण्याचे प्रयत्न केले जात असताना पाकिस्तानच्या पाणबुडी कार्यक्रमामुळे प्रादेशिक पातळीवर असंतुलन निर्माण झाले आहे.

भूराजकीय विचार करून भारताने नौदलाच्या ताफ्याला भक्कमपणा आणण्यासाठी पावले टाकण्यास सुरुवात केली आहे. २०२४–२५ या काळात नौदलाचा विस्तार आणि व्याप्ती पाहिल्यास आत्मनिर्भर आणि दूरदृष्टीचे आकलन होते. स्वदेशी पातळीवर युद्धनौकांची निर्मिती, बांधणी, संरक्षण सहकार्य आणि सामरिक मोहिमांतील यश पाहता भारतीय नौदल भक्कम रूप धारण करत असल्याचे निदर्शनास येते. जानेवारी २०२५ मध्ये भारतीय नौदलात तीन प्रमुख लढाऊ जहाजांचा समावेश झाला. यात आयएनएस नीलगिरी, आयएनएस सूरत आणि आयएनएस वाग्शीर. हे लढाऊ जहाज केवळ अत्याधुनिकच नाही, तर भारतीय जहाज बांधणीतील अत्युच्च नमुना आणि आत्मनिर्भरतेची साक्ष देणारे आहेत.

याशिवाय रशियाकडून मिळालेले आयएनएस 'तुशील'मध्ये परकी अवलंबित्व कमी करताना ९० टक्के स्वदेशीवर भर दिला आहे. आता नौदलाकडे १३० पेक्षा अधिक सक्रिय लढाऊ जहाज आहेत आणि २०३५ पर्यंत या जहाजांची संख्या २०० वर नेण्याची योजना आहे. त्यामुळे याकडे केवळ आकडेवारी म्हणून न पाहता कुशल रणनीतीचादेखील तो भाग ठरत आहे. भारताने आपल्या सागरी रणनीतीला केवळ देशांतर्गतच निर्मितीपुरती मर्यादित ठेवले नाही.

फ्रान्ससमवेत २६–राफेल एम लढाऊ विमानांचा आणि तीन नवीन स्कॉर्पिन पाणबुड्यांचा व्यवहार आयएनएस विक्रांतची क्षमता वाढविणार्या आहेत. त्याचवेळी जर्मनच्या थिसेनक्रूपच्या मदतीने सहा पाणबुड्यांच्या निर्मितीचा करार आपल्या पाणबुडी कार्यक्रमाला जागतिक पातळीवर अधोरेखित करणारा आहे. या सहकार्याचा प्रभाव केवळ शस्त्र प्रणालीपुरताच मर्यादित राहणार नाही. वरुणा, मालाबार, मिलान यासारख्या नौदल सरावातून भारतीय सागरी कूटनीतीला बळकटी दिली आहे. त्यामुळे हिंद प्रशांत भागात भारत एक निर्णायक भूमिकेत अस्तित्वात येत आहे.

भारताचे नौदल प्रबळ होत असताना पाकिस्तान देखील चीनच्या मदतीने सागरी शक्ती वाढविण्याचे काम करत आहे. पाकिस्तानला ८ हांगोर श्रेणीतील पाणबुडी अण्वस्त्रसज्ज्ञता करणारी आहे आणि परिणामी प्रादेशिक संतुलनाला आव्हान मिळू शकते. त्यामुळे पाकिस्तानची सेकंड स्ट्राईक कॅपेबिलीटीची क्षमता विकसित होऊ शकते आणि ही बाब भारताला डोकेदुखी ठरू शकते. प्रामुख्याने बाबर–३ क्षेपणास्त्र सज्ज असलेल्या पाणबुड्या अरबी समुद्रात भारताच्या सामर्थ्याला काही प्रमाणात आव्हान देऊ शकतात. त्यामुळे भारतासाठी एएसडब्ल्यू (अँटिसबमरीन वॉरफेअर) क्षमता अणि देखरेख प्रणालीतील गुंतवणूक आवश्यकच नाही, तर अनिवार्य झाली आहे.

दि. १८ जुलै २०२५ रोजी नौदलात आयएनएस निस्तार ही भारताच्या सागरी शक्तीतील मैलाचा दगड ठरली. त्याचवेळी आधुनिक डायव्हिंग सपोर्ट व्हिसल ही ८० टक्के स्वदेशी तंत्रज्ञानाने तयार झालेली असून ती समुद्रात ६५० मीटरपर्यंत बचावकार्य राबविण्यास सक्षम आहे. यात साईड स्कॅन सोनार, आरओव्ही आणि डीप सी डायव्हिंग सिस्टीम यासारख्या उच्च प्रतीच्या प्रणाली आहेत. सिंगापूर येथे पॅसेफिक रीच २०२५ च्या युद्ध सरावात सहभागी झालेले निस्तार हे भारतीय नौदलाचे तंत्रज्ञान, कुटनीती आणि जागतिक सहकार्य असा त्रिवेणी संगमाचे प्रतीक दाखविणारे ठरले.

# बुद्ध पूजा समजून घेताना ...

बुद्ध पूजेत आलेल्या काही महत्त्वाच्या शब्दांचा अर्थ समजून घेऊ. या गाथेत तीलोक (तीन जग / त्रिलोक) असा उल्लेख आहे. तीन क्षेत्रे महत्त्वाची मानली जातात.बुद्ध कालीन संसारातील जीवांची स्थिति तीन प्रकारची होती, ज्याला तीन लोक किंवा तीलोक म्हणतात.१. कामलोक २. रूपलोक ३. अरूपलोक प्रत्येक लोक हा जीवनातील वेगवेगळ्या मानसिक व आध्यात्मिक अवस्थांचा प्रतीक आहे. कामलोक म्हणजे इच्छांचे, वासनांचे, भौतिक सुख दुःख यांचे क्षेत्र .मानव, पशु, असुर, देव यांचा सहभाग होता. रूपलोक म्हणजे ध्यान, साधना, आध्यात्मिक प्रगती साधलेल्या लोकांचे क्षेत्र.शरीर भौतिक असले तरी मन प्रगल्भ व शुद्ध असलेले. ध्यान, साधना, नैतिक आचरण विकसित केलेले .सुखापेक्षा मानसिक प्रगती महत्त्वाची मानणारे लोकसमूह. अरूपलोक म्हणजे पूर्ण शुद्धता, उच्चतम आध्यात्मिक अवस्था किंवा निर्वाण प्राप्त केलेल्या लोकांचा समूह होय. ते प्रज्ञावान असत. ज्यांनी अज्ञान आणि भौतिक आसक्तीचा त्याग केलेला आहे असा लोकसमूह होय.सर्व प्राणी या तीन स्तरांमध्ये जन्म घेतात लोभ, द्वेष, मोह यावर आधारित कर्मानुसार जीवांची स्थिति बदलते.मानसिक स्थिरता, प्रज्ञा आणि नैतिकता विकसित करणे आवश्यक ठरते. निर्वाण साधने हे प्रत्येक उपासकाचे ध्येय असावे. त्यातून,सर्व दुःखांचा अंत होऊन, जाती,जरा ,मरण या फेऱ्यातून मुक्ती आणि अखंड शांती मिळते. बुद्धकालीन तीन लोक हे मनुष्याच्या जीवनातील मानसिक, आध्यात्मिक आणि नैतिक स्थितीचे प्रतिक आहेत. आपण या तीन लोकांमधून साधना आणि प्रज्ञेद्वारे मुक्तीच्या मार्गावर जाऊ शकतो.बुद्धांना या तीन लोकांचा दीपकअसे म्हटले जाते, दीपक म्हणजे प्रकाश देणारा, अंधकार दूर करणारा दीप होय. म्हणजे संसारातील तीन लोकांमधील अज्ञानाचा अंधकार दूर करणारा प्रकाशमान गुरु.लोभ, द्वेष, मोह या इच्छांमुळे जीव दुःख अनुभवतात.बुद्धाची शिकवण अहिंसा, करुणा, शील,समता, प्रज्ञा यांचा प्रकाश देते. बुद्ध सर्वांमध्ये मानसिक स्थिरता, विवेक, प्रज्ञा जागवतात. धम्म मार्गावर अरुढ झाल्यावर सर्व दुःख नष्ट करता येते व सर्वोच्च शांती साधता येते. हा ज्ञानाचा प्रकाश जो निर्वाणपर्यंत पोहोचवतो. याचाच अर्थ बुद्ध हे सर्व लोकांमध्ये अज्ञान दूर करणारे, ज्ञानाचा प्रकाशमान दीपक आहेत. बुद्ध सांगतात अज्ञानाचा नाश करा व प्रज्ञेचा दीप प्रज्वलित करा. बुद्ध पूजेमध्ये बुद्धांच्या जीवनातील अनेक ठिकाणांचे उल्लेख येतात.बुद्धांच्या पवित्र अवशेषांसाठी भारतात अनेक महत्त्वाची स्थळे आहेत. या स्थळांमध्ये बुद्धांच्या जीवनातील विविध टप्प्यांचे आणि घटनांचे स्मरण होते. त्यातील भारतातील दहा महत्त्वाची बुद्ध अवशेष असलेली स्थळे आणि त्यांचे वैशिष्ट्ये पाहूयात. १. पिपरहवा (उत्तर प्रदेश) वैशिष्ट्य: १८९८ मध्ये उत्खननाद्वारे येथे बुद्धांच्या अवशेषांचा शोध लागला. या अवशेषांमध्ये बुद्धांचे हाडांचे तुकडे, क्रिस्टल कॅस्केट्स आणि सोन्याचे दागिने समाविष्ट आहेत. या अवशेषांचा संग्रह दिल्लीतील राष्ट्रीय संग्रहालयात आणि कोलकात्याच्या भारतीय संग्रहालयात ठेवलेला आहे. २. सारनाथ (उत्तर प्रदेश) वैशिष्ट्य: बुद्धांनी येथे पहिला धम्म उपदेश दिला, ज्याला 'धम्मचक्र प्रवर्तन' म्हणतात. येथे असलेला 'धर्मराजिका स्तूप' बुद्धांच्या अवशेषांनी सुशोभित आहे. सारनाथ हे जागतिक वारसा स्थळ म्हणून णछएडउज कडून मान्यता प्राप्त आहे. ३. कुशीनगर उत्तर प्रदेश.वैशिष्ट्य: येथे बुद्धांनी महापरिनिर्वाण' प्राप्त केले, म्हणजेच मृत्यू. 'परिनिर्वाण स्तूप' आणि 'रामभार स्तूप' ही प्रमुख स्थळे आहेत. येथे बुद्धांच्या अवशेषांचा संग्रह देखील आहे. ४. बुद्धगया(बिहार) वैशिष्ट्य: येथे बुद्धांनी बोधी वृक्षाखाली ४९ दिवस ध्यान करून 'बुद्धत्व' प्राप्त केले. महाबोधी बिहार आणि ८० फूट उंच बुद्धाची मूर्ती येथे आहे. हे स्थळ णछएडउज जागतिक वारसा स्थळ म्हणून मान्यता प्राप्त आहे. ५. सांची (मध्य प्रदेश) वैशिष्ट्य: येथे असलेला 'महास्तूप' हा भारतातील सर्वात जुना दगडी स्मारक आहे. हा स्तूप बुद्धांच्या अवशेषांनी सुशोभित आहे आणि त्यावर सुंदर कोरीवकाम केलेले आहे. ६. वैशाली (बिहार) येथे बुद्धाने अनेक वर्षावास केले.

बुद्धांच्या अवशेषांचा संग्रह देखील आहे. ७. राजगीर (बिहार) वैशिष्ट्य: येथे बुद्धांनी 'वयालोक' आणि 'सप्तपदी' यांसारख्या ध्यानस्थळांवर ध्यान साधना केली. येथे 'सोनभद्र' सारखी प्रमुख स्थळे आहेत.८. नालंदा( बिहार) वैशिष्ट्य: येथे प्राचीन नालंदा विद्यापीठ होते, जे बुद्धांच्या शिक्षणाचे केंद्र होते. येथे असलेली 'नालंदा खुदाई' आणि 'नालंदा संग्रहालय' ही प्रमुख स्थळे आहेत.९. श्रावस्ती (उत्तर प्रदेश)वैशिष्ट्य: येथे बुद्धांना दान केलेले'जेतवन' आहे. बुद्धानी तेथे अनेक वर्षावास केलेले आहेत. येथे असलेली 'जेतवन' आणि 'अंगुलिमाल' ही प्रमुख स्थळे आहेत.१०. संकिसा (उत्तर प्रदेश)वैशिष्ट्य: येथे येथे असलेली 'संकिसा स्तूप' आणि 'संकिसा विहार' ही प्रमुख स्थळे आहेत. या सर्व स्थळांमध्ये बुद्धांच्या अवशेषांचा संग्रह, स्मारक आणि ध्यानस्थळे आहेत, ज्यामुळे बुद्धांच्या जीवनातील विविध टप्प्यांचे आणि घटनांचे स्मरण होते. या स्थळांना भेट देणे म्हणजे बुद्धांच्या शिकवणीला प्रत्यक्ष अनुभवणे होय. त्यानंतर बुद्ध पूजेत येणारा महत्त्वाचा शब्द म्हणजे नागलोक.हे एक बौद्ध धार्मिक केंद्र होते. जे भारताच्या महाराष्ट्र राज्यातील नागपूर शहराजवळील भिलगाव या ठिकाणी स्थित आहे. नागलोक हे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बौद्ध धम्म स्वीकाराच्या ऐतिहासिक घटनेशी संबंधित आहे. वॉकिंग बुद्ध मूर्ती: ५६ फूट उंचीची बुद्धाची भव्य मूर्ती आहे. या परिसरात सध्या नागार्जुन प्रशिक्षण संस्था आहे. जी बौद्ध धम्म आणि डॉ. आंबेडकर यांच्या विचारधारेचे शिक्षण देणारी संस्था आहे. हा नागवंशींचा प्रदेश होय. बौद्ध मान्यतेनुसार नागलोक हा भूमीत, जलाशयांमध्ये आणि पर्वतांमध्ये वास करणाऱ्या नागवंश प्रजाती किंवा त्यांचे साम्राज्य म्हणून मानला जातो. भारतात नागलोकाशी संबंधित अशी अनेक ऐतिहासिक ठिकाणे आहेत. काही नागवंशींचा प्रतीकात्मक संदर्भ स्तूपांमध्ये आढळतो. बोधगया बोधिवृक्षाजवळ नागांचे प्रतीक आणि शांतीसंबंधी स्मारक आहे. मध्य प्रदेश मध्ये सांची महास्तूपावर नागाकृती शिल्प, नागलोकाशी प्रतीकात्मक संबंध आहे. उत्तर प्रदेश कुशीनगर परिनिर्वाण स्थान, नागांच्या रक्षणाची कथा जोडलेली आहे. राजस्थान / गुजरात काही प्राचीन नागवंशी किल्ले आणि स्तूपे, पुरात शिलालेखांनुसार कर्नाटक / तमिळनाडू नागवंशींच्या वंशाशी संबंधित विहारे आणि बौद्ध स्मारके आढळतात. याचा अर्थ, भारतातील नागलोक संपूर्ण उपमहाद्वीपातील नागवंशींचे ऐतिहासिक, पुरातात्त्विक आणि आध्यात्मिक क्षेत्र होते. नागलोक हे जीवनशक्ती, जलसंपदा आणि प्राणीजीवनाचे प्रतीक आहेत. म्हणजेच नागलोक हे फक्त भौगोलिक नसून आध्यात्मिक ऊर्जा आणि नैतिक , आध्यात्मिक शिकवणीचे प्रतीक आहे. बुद्ध पूजेत बुद्धांना दस बल तनुजम (दसबल तनुजं) असे म्हटले जाते, ज्याचा अर्थ बुद्ध हे दहा बलांचे (शक्तीचे) मूर्त रूप आहेत असा आहे. या दहा बलांना बौद्ध धम्मात दशबल किंवा दशतत्त्व बल असे संबोधले जाते. हे दहा बल बुद्धांच्या अद्वितीय ज्ञान, शक्ती आणि शिकवणीच्या क्षमतेचे प्रतीक आहेत. बुद्धांची दहा बलस्थाने समजून घेऊया. बौद्ध ग्रंथांमध्ये, विशेषतः महासिंहसन्नादा सुत्त आणि सिंहसन्नादा सुत्त मध्ये, बुद्धांच्या दहा बलस्थानांचा उल्लेख आहे. हे बल बुद्धांना त्यांच्या शिकवणीच्या कार्यात समर्थ बनवतात.
१.सथानास्थानज्ञाणबल : बुद्धांना शक्य आणि अशक्य यांचे ज्ञान असते.
२. कर्मविपाकज्ञाणबल : भूत, वर्तमान आणि भविष्यकाळातील कर्मांचे परिणाम समजून घेण्याची क्षमता.
३. संसारज्ञान बल : संसारातील जन्म, मृत्यू आणि पुनर्जन्म यांचे ज्ञान.
४. इंद्रियपरापरज्ञाणबल : जीवांच्या इंद्रियांची स्थिती आणि त्यांचे परस्पर संबंध समजून घेण्याची क्षमता.
५. धातुःज्ञानबल : जीवांच्या नैतिक प्रवृत्तींविषयीचे ज्ञान.६.पुर्वनिवासज्ञान बल : भूतकाळातील जन्मांची माहिती.
७. दिब्बचक्षुज्ञान बल : दिव्यदृष्टी, म्हणजेच इतरांच्या मनातील विचार समजून घेण्याची क्षमता.
८. आसवक्षयज्ञाणबल : आसव किंवा मानसिक विकारांचे नाश करण्याचे ज्ञान.
९.धम्मचक्कपवत्तनज्ञान बल: धम्मचक्काचा (धर्मचक्राचा) प्रारंभ करण्याचे ज्ञान.
१०. निर्वाणज्ञान बल : निर्वाण प्राप्त करण्याचे ज्ञान.
या दहा बलांचा अभ्यास केल्यास, बुद्धांच्या शिकवणीची खोली आणि त्यांचे अद्वितीय ज्ञान समजून येते. हे बल बुद्धांना त्यांच्या उपदेशांमध्ये अचूकता, करुणा आणि प्रभावीपणे मार्गदर्शन करण्याची क्षमता प्रदान करतात.आध्यात्मिक प्रगल्भता लाभते. बुद्धांच्या ज्ञानाचा अभ्यास केल्याने, व्यक्तीला ज्ञान आणि मानसिक शांती मिळू शकते. बुद्धांच्या शिकवणींनुसार, व्यक्ती समाजातील इतरांना मदत करण्यासाठी प्रेरित होऊ शकतो.दशबलांचा अभ्यास केल्याने, व्यक्तीला योग्य आणि नैतिक निर्णय घेण्याची क्षमता प्राप्त होते. दशबलांचा अभ्यास केल्याने, व्यक्तीला बुद्धांच्या शिकवणींचा सखोल आणि व्यापक अर्थ समजून येतो, ज्यामुळे त्याच्या जीवनात सकारात्मक बदल घडू शकतात.

*********

किशोर कासारे
मंडणगड (दाभट)
८७६७४२५१८०

## उत्सवकाळात श्वसन संसर्ग वाढण्याचा धोका, प्रतिबंधात्मक उपायांचे पालन करण्याचा तज्ज्ञांचा सल्ला

उत्सवादरम्यान वाढते विकार
श्वसनाचा विकार का वाढतोय
श्वसनाच्या विकारासाठी काय करावे

राज्यभरात गणेशोत्सव हा मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. या उत्सवादरम्यान आपले आरोग्य चांगले रहावे याकरिता प्रत्येकाने आवश्यक ती सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. श्वसन संसर्ग दूर ठेवण्यासाठी या महत्त्वाच्या टिप्सचे पालन करा. प्रत्येकाने उत्सवाचा आनंद घेत असताना आपल्या आरोग्याकडेही तितकेच लक्ष देणे गरजेचे आहे.

गणेशोत्सव हा आनंद, भक्ती आणि एकत्र येऊन साजरा सण आहे, जो सर्व वयोगटातील व्यक्ती मोठ्या उत्साहाने साजरा करतात. शिवाय आपल्या कुटुंबियांना, मित्र परिवाराला आणि समाजाला एकत्र आणतो. सार्वजनिक गणेशोत्सवात दर्शनासाठी झालेली आणि त्या गर्दीत खोकणे, शिंकणे आणि अगदी बोलणे याद्वारे देखील विषाणू आणि बॅक्टेरिया चा प्रसार होतो. या सणाच्या काळात मुलं, वयोवृद्ध महिला, गर्भवती महिला आणि दमा किंवा कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या व्यक्ती असुरक्षित असतात यामुळे सावधगिरी बाळगणे अधिक गरजेचे आहे.

काय सांगतात तज्ज्ञ एम्स हॉस्पिटल डोंबिवलीचे जनरल फिजिशियन आणि इंटेन्सिव्हिस्ट डॉ. कुशल बांगर सांगतात की, सणासुदीचा काळ हा संसर्ग वाढीस कारणीभूत ठरु शकतो. उत्सवादरम्यान मोठ्या संख्येने लोक एकत्र येत असल्याने सर्दी, फ्लू आणि घशाच्या संसर्गासारख्या श्वसन संसर्गांमध्ये चिंताजनक वाढ होऊ शकते. प्रत्येकाने सतर्क राहावे आणि सतत खोकला, ताप किंवा श्वास घेण्यास त्रास होणे यासारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष करु नका. निरोगी राहण्यासाठी आणि श्वसन संसर्ग रोखण्यासाठी मास्कचा वापर करणे, सुरक्षित अंतर राखणे आणि हायड्रेटेड राहणे गरजेचे आहे. आपले आरोग्य जपून हा सण भक्तीने साजरा करण्याचा प्रयत्न करा.

सामान्य लक्षणे कोणती? डॉ. अहमद खान, इंटरनल मेडिसिन एक्स्पर्ट, मधुमेह विकार तज्ज्ञ आणि संसर्गजन्य रोग तज्ज्ञ, मेडिकव्हर हॉस्पिटल्स, खारघर, नवी मुंबई यांनी सांगितले की, श्वसन संसर्गाची सामान्य लक्षणे म्हणजे खोकला आणि घसा खवखवणे, वाहणारे किंवा चोंदलेले नाक, ताप आणि अंगदुखी, थकवा, अशक्तपणा, छातीत घरघर किंवा श्वास घेण्यास त्रास होणे अशी लक्षणे आढळून येतात.अशी लक्षणे आढळतात विलंब न करता डॉक्टरांचा सल्ला घ्या कळवा आणि वेळीच व्यवस्थापन करा.

अधिक जाणून घ्या काय करावे पालकांनी आपल्या मुलांना हात धुण्याचे योग्य तंत्र शिकवा, गर्दीच्या जागी विशेषतः सार्वजनिक गणपतीच्या ठिकाणी मास्क वापरण्यास प्रोत्साहित करा. गर्दीच्या ठिकाणी मुलाला घेऊन जाणे टाळणे योग्य राहिल किंवा गर्दी नसताना सकाळी लवकर बाप्पाच्या दर्शन घ्या थोरामोठ्यांनी देखील गर्दीच्या ठिकाणी मास्कचा वापर करा,सोबत हँड सॅनिटायझर बाळगा आणि भरपूर पाणी प्या. दमा, ब्राँकायटिस किंवा ॲलर्जी असलेल्यांनी इनहेलर किंवा डॉक्टरांनी लिहून दिलेली औषधे जवळ ठेवा. खूपच गर्दी असेल तर अशा ठिकाणी दुरुन दर्शन किंवा ानलाईन दर्शनाचा लाभ घ्या

घरातील वयस्कर व्यक्तींनी कमी गर्दीच्या वेळी दर्शनास जाणे किंवा ऑनलाइन माध्यमाद्वारे वापर करणे योग्य राहिल. वेळोवेळी लसीकरण (फ्लू आणि न्यूमोनिया) आणि सर्दी किंवा खोकला असलेल्या लोकांच्या संपर्कात येणे टाळा. शिंकताना आणि खोकताना तोंड झाका. ताजे, घरी शिजवलेले अन्नपदार्थांचे सेवन करा, भरपूर पाणी प्या आणि हायड्रेटेड रहा तसेच रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी चांगली झोप घ्या. स्वतःच्या मर्जीने औषधोपचार करणे टाळा

दम लागणे आणि खुप थकवा जाणवणे यासारख्या लक्षणांसाठी त्वरीत वैद्यकिय मदत घ्या. या टिप्सचे पालन करून, गणेशोत्सवाचा आनंद घेणे आणि श्वसन संक्रमण टाळणे शक्य आहे

## दुपारच्या जेवणासाठी २० मिनिटांमध्ये झटपट बनवा स्वादिष्ट मसालेदार भात, नोट करून घ्या पदार्थ

दुपारच्या जेवणात कायमच डाळभात किंवा भाजी चपाती खाऊन कंटाळा आल्यानंतर काहींना काही नवीन पदार्थ खाण्याची सगळ्यांचं इच्छा होते. अशावेळी बऱ्याचदा बाहेरून विकत आणलेले पदार्थ खाल्ले जातात. चायनीज, बिर्याणी किंवा इतर मसालेदार पदार्थ आणून खाल्ले जातात. नेहमीच बाहेरील विकतचे पदार्थ खाल्यामुळे आरोग्याला हानी पोहचते. यामुळे कोलेस्ट्रॉल वाढू शकतो. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला कमीत कमी तेलाचा वापर करून सोप्या पद्धतीमध्ये चविष्ट मसालेदार भात बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. तुम्ही बनवलेला हा पदार्थ लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप जास्त आवडेल. मसाले भात आणि दह्याची कोशिंबीर हे कॉम्बिनेशन सगळ्यांचं खूप जास्त आवडते. घाईगडबडीच्या वेळी कमीत कमी साहित्यामध्ये तुम्ही मसालेभात बनवू शकता. चला तर जाणून घेऊया रेसिपी.

साहित्य:
तांदूळ
जिरं
मोहरी
मटार
फ्लॉवर
गाजर
बीन्स
शिमला मिरची
लाल तिखट
पुलाव मसाला
धणे पावडर
मीठ


कृती:
मसाले भात बनवण्यासाठी तांदूळ पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर त्यात पाणी घालून काहीवेळ तांदूळ भिजत ठेवा.

टोपात तेल गरम करून त्यात मोहरी, जिरं, कढीपत्ता आणि बारीक चिरलेला कांदा, टोमॅटो टाकून व्यवस्थित भाजून घ्या.

कांदा लगेच शिजण्यासाठी त्यात चवीनुसार मीठ घालून मिक्स करा. दोन्ही पदार्थ व्यवस्थित शिजल्यानंतर काहीवेळ मंद आचेवर ठेवा.

त्यानंतर त्यात लाल तिखट, धणे पावडर, गरम मसाला, हळद आणि पुलाव मसाला घालून व्यवस्थित मिक्स करा. मसाले भाजल्यानंतर त्यात सर्वच धुवून बारीक चिरलेल्या भाज्या टाकून मिक्स करा.

सर्व भाज्या मसाल्यांमध्ये मिक्स करून त्यात





गरम पाणी घाला आणि उकळी काढून घ्या. पाण्याला उकळी आल्यानंतर त्यात भिजवलेला तांदूळ टाकून व्यवस्थित मिक्स करा.

तांदूळ शिजल्यानंतर गॅस बंद करून मसाले भात खाण्यासाठी सर्व्ह करा.

## पोट- मांड्यांवरील चरबी कमी करण्यासाठी 'या' डाळीच्या पाण्याचे नियमित करा सेवन, झपाट्याने कमी होईल चरबी

जगभरात लाखो लोक लठ्ठपणाच्या समस्येमुळे त्रस्त आहेत. वजन वाढल्यानंतर ते कमी करण्यासाठी अनेक वेगवेगळे प्रयत्न केले जातात. पोट आणि मांड्यांवर चरबी वाढल्यानंतर काहीवेळा महिलांचा आत्मविश्वास कमी होऊन जातो. सतत तिखट आणि तेलकट पदार्थांचे अतिसेवन केल्यामुळे शरीर आणि मांड्यांवर अनावश्यक चरबी वाढू लागते. चरबीचा थर वाढल्यानंतर काहीवेळा मधुमेह आणि कोलेस्ट्रॉल वाढू लागतो. वजन वाढल्यानंतर अनेक लोक तासनतास जिममध्ये जाऊन व्यायाम करतात तर काहीजण वेगवेगळ्या सप्लिमेंटन्सचे सेवन करतात. पण तरीसुद्धा वजन कमी होत नाही. चुकीचा डाएट फॉलो केल्यामुळे शरीराला हानी पोहचण्याची शक्यता असते. त्यामुळे वाढलेले वजन कमी करण्यासाठी घरगुती पदार्थांचे सेवन करावे.




प्रत्येक स्वयंपाक घरात वेगवेगळ्या प्रकारच्या डाळी असतात. तूरडाळ,मुगडाळ, मसूर डाळ इत्यादी अनेक वेगवेगळ्या प्रकारच्या डाळी स्वयंपाक घरात असतात. या डाळींचा वापर करून वेगवेगळे अनेक पदार्थ बनवले जातात. डाळींचे सेवन केल्यामुळे शरीरात जमा झालेली घाण बाहेर पडून जाण्यासाठी आहारात फायबरयुक्त पदार्थांचे सेवन करावे. शरीरासाठी डाळी डिटॉक्सिफाईड एजंटप्रमाणे काम करतात. डाळींमध्ये फायबर आणि फॅट्स इत्यादी अनेक घटक आढळून येतात. साथीच्या आजारांपासून शरीर कायमच निरोगी ठेवण्यासाठी डाळींचा आहारात समावेश करावा. आज आम्ही तुम्हाला कोणत्या डाळींच्या पाण्याचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. या पाण्याच्या सेवनामुळे सेवन शरीराला अनेक फायदे होतात.

हिरवी मुगाच्या डाळीचे सेवन: वाढलेले वजन कमी करण्यासाठी हिरव्या मुगाच्या डाळीचे सेवन करावे. डाळीचे पाणी तयार करून नियमित प्यायल्यास शरीराला अनेक फायदे होतात. हिरवे मूग खाणे आरोग्यासाठी अतिशय गुणकारी आहेत. वजन कमी करण्यासाठी हिरव्या मुगाचे सेवन सालीसकट करावे. डाळींमध्ये असलेले फॅट्स आतड्या सहज पचवतात. मुगाच्या डाळींमध्ये ग्लायसेमिक इंडेक्स कमी असते, ज्यामुळे मुगाची डाळ सहज पचन होते. मुगाच्या डाळीचे सेवन केल्यामुळे रक्तातील साखर झपाट्याने वाढत नाही. सकाळी उठल्यानंतर नियमित मुगाच्या डाळीचे पाणी प्यायल्यास भूक लागत नाही. पोट जास्त वेळ भरलेले राहते.

मुगाची डाळ खाण्याचे फायदे: हिरव्या मुगाच्या डाळींचे पाणी नियमित प्यायल्यास शरीराला अनेक फायदे होतात. यामुळे गॅस कमी होतो. आतड्यांमध्ये चांगल्या बॅक्टरीया निर्माण करण्यासाठी मुगाच्या डाळीचे सेवन करावे. मुगाच्या पाण्याचे नियमित सेवन केल्यास आतड्यांमधील घाण सहज बाहेर पडून जाते. याशिवाय सतत तिखट आणि तेलकट पदार्थांचे सेवन केल्यामुळे बद्धकोष्ठता आणि गॅस वाढतो, अशावेळी मुगाच्या डाळीचे पाणी प्यावे. ओव्हरइटींग टाळण्यासाठी तुम्ही नियमित डाळीचे पाणी पिऊ शकता. यामध्ये असलेले फायबर शरीरास खूप महत्वाचे आहेत. शरीरातील फॅट्स मेटाबॉलिझ्म वाढवण्यासाठी मुगाच्या डाळीचे पाणी प्यावे.

### F-Qs (संबंधित प्रश्न)

लठ्ठपणा म्हणजे काय?

लठ्ठपणा म्हणजे शरीरात अतिरिक्त चरबी जमा होणे, ज्यामुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होऊ शकतात.

लठ्ठपणाची कारणे काय आहेत?

जास्त कॅलरी असलेले अन्न खाणे आणि कमी शारीरिक हालचाल हे लठ्ठपणाचे मुख्य कारण आहे. नियमित व्यायाम न केल्याने शरीरातील अतिरिक्त ऊर्जा चरबी म्हणून साठते.

लठ्ठपणाशी संबंधित आरोग्य धोके:

मधुमेह, उच्च रक्तदाब, हृदयविकार, उच्च कोलेस्ट्रॉल, काही प्रकारचे कर्करोग, झोपेचे विकार.

## संध्याकाळची छोटी मोठी भूक भागवण्यासाठी घरी बनवा पनीर गोल्डन फ्राय, लहान मुलांना आवडेल चमचमीत पदार्थ

संध्याकाळच्या वेळी सगळ्यांचं काहींना काही खाण्याची इच्छा होते. दिवसभर काम आणि प्रवाह करून थकून आल्यानंतर भूक लागते. भूक लागल्यानंतर नाश्त्यात नेमकं काय खावं, हे सुचत नाही. कायमच विकतचे पदार्थ आणून खाल्ले जातात. कधी पाणीपुरी, शेवपुरी तर कधी चायनीज आणि इतर तेलकट पदार्थ खाल्ले जातात. पण कायमच विकतचे पदार्थ खाणे आरोग्यासाठी अजिबात चांगले नाही. सतत तेलकट पदार्थांच्या सेवनामुळे शरीरात कोलेस्ट्रॉल वाढण्याची जास्त शक्यता असते. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला छोटी मोठी भूक भागवण्यासाठी सोप्या पद्धतीमध्ये पनीर गोल्डन फ्राय बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. हा पदार्थ झटपट तयार होतो. कमीत कमी साहित्यात आणि कमी वेळेत जर काही बनवण्याचे असेल तर तुम्ही पनीर गोल्डन फ्राय बनवू शकता. चला तर जाणून घेऊया पनीर गोल्डन फ्राय बनवण्याची सोपी रेसिपी.

साहित्य:
पनीर
मीठ
कॉर्नफ्लोर
मैदा
चाट मसाला
आलं लसूण पेस्ट
लाल तिखट
तेल

कृती: पनीर गोल्डन फ्राय बनवण्यासाठी सर्वप्रथम, पनीर पाण्याने धुवून घ्या. त्यानंतर पनीरचे मध्यम आकाराचे तुकडे करा.




वाटीमध्ये मैदा, कॉर्नफ्लोर, लाल तिखट, चाट मसाला, गरम मसाला, आलं लसूण पेस्ट आणि चवीनुसार मीठ घालून व्यवस्थित मिक्स करा.

त्यानंतर मिश्रण तयार करण्यासाठी त्यात आवश्यकतेनुसार पाणी घालून जाडसर पेस्ट बनवा. मिश्रण बनवताना त्यात जास्त पाणी घालू नये.

तयार केलेल्या मिश्रणात पनीरचे तुकडे टाकून व्यवस्थित मिक्स करा.

कढईमध्ये तेल गरम करून त्यात पनीरचे तुकडे टाकून दोन्ही बाजूने गोल्डन होईपर्यंत व्यवस्थित फ्राय करून घ्या.

पनीर फ्राय करून झाल्यानंतर त्यावर चाट मसाला टाकून मिक्स करा आणि पुदिन्याच्या चटणीसोबत सर्व्ह करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले पनीर गोल्डन फ्राय. हा पदार्थ घरात सगळ्यांचं आवडेल.

# जातीय द्वेषातून कारला येथे बौद्ध विधवा महिलेचे घर डोजरने पाडले...

## आम्हाला न्याय मिळालाच पाहिजे - पीडित महिलेचा आक्रोश

लातूर :- मौजे कारला (ता. औसा, जि. लातूर) येथे घडलेल्या एका भीषण घटनेने पुन्हा एकदा महाराष्ट्रातील जातीवादाचे विदारक वास्तव उघड केले आहे. गावातील बौद्ध विधवा महिलेचे राहते घर गावच्या विद्यमान सरपंच सौ. अलका सुरेश पवार आणि त्यांचे पती सुरेश सोपान पवार यांनी डोजरने उद्ध्वस्त केल्याचा धक्कादायक प्रकार घडला आहे. या प्रकरणात ग्रामसेवक व सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी देखील सहभागी असल्याचे स्पष्ट झाले आहे. शासनाने दिलेली जागा, तरीही सत्तेचा गैरवापर पीडित महिलेचे वडील कालकथित दादाराव गोविंद कांबळे यांना सन १९८३ मध्ये महाराष्ट्र शासनाने ३३ फूट ÷ ३३ फूट क्षेत्रफळाची जागा मालकीहक्काने देऊन त्याचा कबाला दस्त जारी केला होता. त्या जागेवर मागील ४२ वर्षांपासून पत्र्याचे शेड बांधून महिला आपल्या वृद्ध आईसह राहत होती. घरास नळजोडणी, विजेची जोडणी, तसेच ग्रामपंचायतीकडून घरपट्टी भरलेली आहे. पीडितेचे घर कुमठा-किल्लारी मुख्य रस्त्यालगत, आणि सरपंच अलका पवार यांच्या घर व त्यांच्या शाळा - स्व. सौ. केशराई विद्यालय, कारला - समोरच आहे. हाच गुन्हा ठरल्याचे महिलेचे म्हणणे आहे. सरपंच अलका पवार यांनी वारंवार जातीय भाषेत अपमान करत म्हटले -

तुझे महारग्यांचं रांडचं घर माझ्या शाळेसमोर नको. मी सरपंच झालेय, आता तुझं घर इथे राहू देणार नाही. १५ ऑक्टोबरला बेघर केलं - घरासह आयुष्य उद्ध्वस्त १५ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी सुमारे दहा ते बारा वाजेच्या सुमारास सरपंच अलका सुरेश पवार, त्यांचे पती सुरेश सोपान पवार, ग्रामसेवक जगन्नाथ गिरी, सार्वजनिक बांधकाम विभाग (औसा) येथील सहाय्यक अभियंता रोहन जाधव, सौ. अनुसया नामदेव घोडके, तसेच ४-५ तोंड बांधलेल्या महिला व ४-५ पुरुषांनी एकत्रितपणे बौद्ध विधवा महिलेच्या घरात घुसखोरी केली. त्यांनी प्रथम महिलेला केसांला ओढून खाली पाडले, लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली, तिच्या वृद्ध आईलाही चापटाने मारहाण करून दोघींनाही घराबाहेर ओढून काढले. आमचं घर गेलं, पण न्यायासाठी लढू पीडित महिलेने व्यथित होत सांगितले -

आमचं घर पाडून आम्हाला रस्त्यावर आणलं. माझी आई वृद्ध आहे, आम्ही बेघर झालो. आमचा गुन्हा एवढाच की आम्ही बौद्ध आहोत. गावासमोर आमचा अपमान केला. आता आम्हाला जगण्याची लाज वाटते, पण न्याय मिळवण्यासाठी शेवटपर्यंत लढणार. याप्रकरणी अलका सुरेश पवार - सरपंच, ग्रामपंचायत कारला सुरेश सोपान पवार - सरपंच पती ,जगन्नाथ गिरी - ग्रामसेवक रोहन जाधव - सहाय्यक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग (औसा),अनुसया नामदेव घोडके तसेच ४-५ अनोळखी महिला व ४-५ पुरुष या सर्वांवर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम तसेच भारतीय न्याय संहिता (इछड) अंतर्गत गुन्हे नोंदवण्याची मागणी करण्यात आली आहे. जातीवादाचा जिवंत चेहरा - महाराष्ट्रासाठी कलंक या घटनेने पुन्हा एकदा दाखवून दिले की महाराष्ट्रात आजही जातीय अहंकार, सत्तेचा दुरुपयोग आणि सामाजिक अन्याय मूळ धरून आहे. शासनाने दिलेल्या जागेवर राहणाऱ्या गरीब बौद्ध विधवा महिलेचे घर केवळ सरपंचाच्या शाळेसमोर आहे या कारणावरून उद्ध्वस्त करणे म्हणजे मानवतेला काळिमा फासणे आहे. समतेचा महाराष्ट्र हा घोषवाक्यापुरताच उरला असून, प्रशासनाच्या मौनाने अन्यायाला छुपं संरक्षण मिळतंय, अशी समाजाची भावना आहे. समाजाचा तीव्र निषेध - सरकार जागे होणार कधी? या घटनेविरोधात लातूर जिल्ह्यातील बौद्ध समाज संघटना, आंबेडकरी कार्यकर्ते, सामाजिक न्याय संघटना आणि मानवाधिकार कार्यकर्त्यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. त्यांची मागणी पुढीलप्रमाणे आहे घटनेची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी. सर्व आरोपींना तात्काळ अटक करण्यात यावी. पीडित महिलेला निवारा, नुकसानभरपाई आणि संरक्षण द्यावे. शासनाने जातीय अत्याचारांविरोधात शून्य-सहनशीलता धोरण अवलंबावे. मौजे कारला येथील या घटनेने हे स्पष्ट केले आहे की महाराष्ट्रातील दलित, बौद्ध आणि वंचित समाज अजूनही अन्यायाच्या छायेत जगतो आहे. सरकारने तातडीने लक्ष घालून या घटनेतील दोषींना शिक्षा केली नाही तर हा प्रकार राज्याच्या संविधाननिष्ठ ओळखीवर डाग ठरेल. या घटनेला न्याय मिळालाच पाहिजे - कारण हा केवळ एका महिलेचा नव्हे, तर समतेसाठी लढणाऱ्या संपूर्ण समाजाचा प्रश्न आहे.

## 'आम्ही ९ ते ५ तास काम करणाऱ्या लोकांपेक्षा जास्त मेहनत करतो'; अभिनेत्री काजोलच्या विधानावर अनेकांनी नाराजी व्यक्त

बॉलिवूड अभिनेत्री काजोलने कामाच्या वेळेबाबत केलेले एक विधान सध्या चांगलेच चर्चेत आले आहे. काजोलनं तिच्या 'टू मच विथ काजोल अँड ट्विंकल' या सेलिब्रिटी चॅट शोमध्ये बोलताना एक वक्तव्य केलं, ज्यामुळे वाद निर्माण झाला. तिने, 'कलाकार ९ ते ५ तास काम करणाऱ्या लोकांपेक्षा जास्त मेहनत करतात', असे विधान केले. तिच्या या विधानावरून अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे. काजोलनं हे वक्तव्य केलं, त्यावेळी शोमध्ये वरुण धवन आणि आलिया भट्ट आले होते. शोमध्ये ट्विंकल खन्ना देखील काजोलसोबत होस्टिंग करते. शोमध्ये काजोलने ९ ते ५ काम करणाऱ्या ऑफिस कर्मचाऱ्यांशी स्वतःच्या इंडस्ट्रीतील कामाची तुलना केली काजोलने सांगितले की, 'आपल्याला काम करताना खूप ॲक्टिव्ह राहावं लागतं. तुम्ही काम करत असाल तर १०० टक्के देणे गरजेचं असतं. काही जण ते पूर्ण करतात, पण जेव्हा मी 'लीगल ड्रामः द ट्रायल'च्या दुसऱ्या सीझनसाठी ३५-४० दिवस शूटिंग करत होते, तेव्हा रोज लवकर उठावं लागत होतं, व्यायाम करायचा, जेवण योग्य वेळेत घ्यावं लागायचं. एक इंचही वजन वाढवू नये कारण कपडे बसतील असं ठेवावं लागायचं. हा एक प्रकारे दबाव असतो.' ९ ते ५ काम करणारे डेस्कवर बसतात पुढे काजोल म्हणाली, 'अभिनय करत असलो तरी इव्हेंटसाठीही जावं लागतं. १२-१४ तास ॲक्टिव्ह राहणं हे खूप कठीण काम आहे. ९ ते ५ काम करणारे डेस्कवर बसतात, त्यांना पूर्ण वेळ देण्याची गरज नसते. तुम्ही टी ब्रेक घेऊ शकता, आराम करू शकता, खेळू शकता किंवा फेरफटका मारू शकता. आम्ही तुमच्यासारखं करू शकत नाही.

कलाकारांना त्यांच्या कामात अधिक मेहनत करावी लागते, कारण त्यांचे दिवस खूप लांब आणि ॲक्टिव्ह असतात.' दरम्यान, काजोलच्या या वक्तव्यामुळे सोशल मीडियावर नाराजी व्यक्त केली आहे. तर काहींना तिचं विधान योग्य वाटत आहे.

## अनाथ ६० मुला-मुलींना फटाके, कपडे व मिठाई देऊन केली अनोखी दिपावली साजरी....

नांदेड / प्रतिनिधी :- फटाका असोसिएशनचे संस्थापक अध्यक्ष धनराज मंत्री व धर्मभूषण ड.दिलीप ठाकूर यांच्या संकल्पनेतून अनाथ मुला-मुलींची अनोखी दिपावली हा उपक्रम यंदा अनोख्या पद्धतीने साजरा करण्यात आला.या उपक्रमाअंतर्गत ना.हेमंतभाऊ पाटील व आ.आनंदराव बोंढारकर यांच्या हस्ते ६० अनाथ मुला-मुलींना फटाके, नवीन कपडे आणि मिठाई वाटप करण्यात आली.हा कार्यक्रम रेल्वे स्टेशन रोडवरील गुरुद्वारा मैदानावरील फटाका बाजारामध्ये पार पडला.या वेळी व्यासपीठावर सतीश शर्मा,रहाटे साहेब,संतोष मानधने,प्रतापसिंग खालसा,गुरु भाई,विशाल फाजगे, सुषमा हुरणे,सुरेश शर्मा,संतोष भारती,लालबाजी घाटे व दिनकर सर यांची प्रमुख उपस्थिती होती. मान्यवरांचा शाल,पुष्पगुच्छ व मोत्याच्या माळ घालून सत्कार करण्यात आला.हा सत्कार धनराज मंत्री,आयुष मंत्री,गणेश मंत्री,अनिल मंत्री,सिद्धेश्वर पेटकर,महेश देबडवार, अनिकेत परदेशी,शुभम परदेशी, शुभम वट्टमवार,विशाल मुत्तेपवार, अजय ठाकुर,संदिप रायेवार,संजय गायकवाड,आनंद मुथा,शेख साद्दुला, शेख युसूफ,चिद्रावार,शेख अमजद, विजय मुथा व पियुष मंत्री यांनी केला. प्रास्ताविकात धनराज मंत्री यांनी फटाका व्यापाऱ्यांना दुकाने लावण्यासाठी येणाऱ्या अडचणींचा उल्लेख केला व त्यावर ना.हेमंतभाऊ पाटील यांनी सांगितले की,अनाथांची अनोखी दिवाळी हा अतिशय स्तुत्य उपक्रम आहे.फटाका व्यापाऱ्यांना येणाऱ्या अडचणीबाबत मी स्वतः अधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहे. तसेच आ.आनंदराव बोंढारकर यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, अशा उपक्रमांची गरज प्रत्येक ठिकाणी असून फटाका असोसिएशनच्या पाठीशी मी सदैव उभा राहीन.या वेळी सुमन मुलींचे बालगृह व लहुजी साळवे अनाथ आश्रम,धनगरवाडी येथील मुलांना चांगल्या प्रतीचे नवीन कपडे,मिठाईचे डबे व मुबलक फटाके देण्यात आले. या कार्यक्रमाचे रंगतदार संचलन ड. दिलीपभाऊ ठाकूर यांनी केले,तर आभार आयुष मंत्री यांनी मानले. दिपावलीच्या पहिल्याच दिवशी अनपेक्षितपणे मिळालेल्या भेटवस्तूंमुळे अनाथ मुला-मुलींच्या चेहऱ्यावर आनंद फुलून आला.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फटाका असोसिएशनच्या सर्व सदस्यांनी मेहनत घेतली व उपस्थित सर्वांच्या चहा फराळा नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.अनाथ मुलांसाठी आगळावेगळा उपक्रम राबवल्याबद्दल संयोजक धनराज मंत्री व ड.दिलीप ठाकूर यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.



## तिकिटे देण्यासाठी ते जमीन अन् पैसे दोन्ही लिहून घेतात ; बिहार निवडणुकीदरम्यान दिलीप जयस्वाल यांचा आरोप

बिहार विधानसभा निवडणुकीसाठी जागावाटपावरून महाआघाडीत संघर्ष सुरू आहे. दरम्यान, बिहार भारतीय जनता पक्षाचे (भाजप) अध्यक्ष दिलीप जयस्वाल यांनी महाआघाडीतील सुरू असलेल्या अंतर्गत कलहावरून विरोधकांवर जोरदार हल्ला चढवला आहे.

भाजप अध्यक्ष दिलीप जयस्वाल म्हणाले, एनडीए युती ही पाच पांडवांची दगडासारखी मजबूत एकता आहे. दुसरीकडे, महाआघाडीत अंतर्गत कलह सुरू आहे. आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. आरजेडी आणि काँग्रेससह सर्व महाआघाडी पक्ष एकमेकांवर आरोप करण्यात आपला वेळ घालवत आहेत.



ज्यांना जागा वाटता येत नाहीत ते सरकार चालवू शकत नाहीत. दिलीप जयस्वाल यांनी यावेळी, जनता पाहत आहे, मतदार पाहत आहेत की जागा वाटू शकत नाही अशी महाआघाडी बिहार चालवू शकत नाही. म्हणूनच, मतदारांनी बिहारमध्ये पुन्हा मोठ्या बहुमताने एनडीए सरकार स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. असेही म्हणाले.

त्यांना तिकिटांच्या नावाखाली जमीन आणि पैसा दोन्ही मिळतो बिहार भाजप अध्यक्ष म्हणाले, महाआघाडीत पैशाचा खेळ सुरू आहे. बिहारच्या विकासासाठी तिकिटांच्या वाटपात पैशाचा खेळ खेळणाऱ्यांकडून काय अपेक्षा करता येईल? नोकरीच्या नावाखाली जमीन नोंदणी करण्याचा त्यांचा इतिहास आहे आणि आज ते तिकिटांसाठी पैसे आणि जमीन दोन्ही घेत आहेत.


महाआघाडीत सुरू असलेल्या संघर्षादरम्यान, काँग्रेस आणि व्हीआयपींनी काल रात्री उशिरा उमेदवारांची एक नवीन यादी जाहीर केली. वृत्तानुसार, काँग्रेसने सहा उमेदवारांची यादी जाहीर केली आहे आणि व्हीआयपींनी पाच उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. बिहारमध्ये ६ आणि ११ नोव्हेंबर रोजी दोन टप्प्यात मतदान होणार आहे आणि १४ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

## सर्व्हर डाउन, तांत्रिक समस्यांमुळे वापरकर्ते नाराज

नवी दिल्ली : सोमवारचा दिवस इंटरनेट युझर्ससाठी गोंधळाचा ठरला आहे. 'कॅन्व्हा' (Canva), 'अमेझॉन वेब सर्व्हिसेस' (-WS) आणि 'स्नॅपचॅट' (Snapchat) सह अनेक मोठे ऑनलाईन प्लॅटफॉर्म एकाच वेळी कोलमडले. या तांत्रिक समस्येमुळे जगभरातील हजारो युझर्सना मनस्ताप सहन करावा लागला.

"-WS' आउटेजचा मोठा परिणामः 'अमेझॉन वेब सर्व्हिसेस' (-WS) मध्ये आलेल्या मोठ्या तांत्रिक बिघाडामुळे अनेक प्स आणि सेवा ठप्प झाल्या. 'अमेझॉन प्राईम व्हिडीओ', 'पर्प्लेक्सिटी एआय' (Perplexity -I) आणि 'स्नॅपचॅट' सारख्या सेवा काम करत नसल्याच्या तक्रारी युझर्सनी नोंदवल्या. 'डाऊनडिटेक्टर'नुसार, "-WS' मुळे गेल्या २४ तासांत १,१०० हून अधिक तक्रारी नोंदल्या गेल्या, ज्यापैकी बहुतांश अमेरिका आणि जगभरातून होत्या. याच कारणामुळे 'रॉब्लॉक्स', 'मॅकडोनाल्ड्स', 'कोइनबेस', 'कॅन्व्हा' आणि 'गुडरीड्स' सारखे अनेक प्लॅटफॉर्म प्रभावित झाले.

युझर्सचा संताप 'एक्स'वर व्यक्तः




या अचानक आलेल्या आउटेजमुळे संतप्त झालेल्या युझर्सनी 'एक्स' (पूर्वीचे ट्विटर) वर आपला संताप व्यक्त केला. एका युझरने अनेक प्लॅटफॉर्मच्या स्क्रीनशॉटसह लिहिले, काय चालले आहे? सर्व काही डाऊन आहे. तर दुसऱ्याने जगभरात इतका मोठा आउटेज, हा सायबर हल्ल्याचा परिणाम आहे का? असा प्रश्न विचारला.

'स्नॅपचॅट'वर सर्वाधिक गोंधळ दिसला. सुमारे ९,००० युझर्सनी प काम करत नसल्याची तक्रार केली. ९१% युझर्सना लॉग इन करण्यात, तर ६% युझर्सना कंटेंट अपलोड करण्यात अडचण आली. यावर युझर्सनी 'एक्स'वर मजेशीर प्रतिक्रिया दिल्या. एका युझरने लिहिले, स्नॅपचॅट डाऊन झाले आहे, अचानक सर्वांचा आरसा सर्वात भयानक प बनला!

'पर्प्लेक्सिटी एआय'लाही या समस्येचा फटका बसला. सीईओ अरविंद श्रीनिवास यांनी 'एक्स'वर स्पष्टीकरण देत सांगितले, पर्प्लेक्सिटी सध्या "-WS'मधील समस्येमुळे डाऊन आहे. आम्ही हे ठीक करण्यासाठी काम करत आहोत.

भारतातही 'कॅन्व्हा' डाऊनः याव्यतिरिक्त, सोमवारी भारतातही 'कॅन्व्हा' पमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याच्या तक्रारी आल्या. अनेक युझर्स प उघडू शकले नाहीत आणि 'सर्व्हर एरर'चा संदेश दिसत होता. 'आयओएस' पवरही आमच्या बाजूने काहीतरी गडबड झाली आहे असा संदेश दिसत होता. या आउटेजवर 'कॅन्व्हा'ने अद्याप कोणतेही अधिकृत वक्तव्य केलेले नाही. 'डाऊनडिटेक्टर'नुसार, काही मिनिटांतच २०० हून अधिक तक्रारी नोंदवल्या गेल्या होत्या.

## हिट अँड रन प्रकरण : अज्ञात वाहनाच्या धडकेत महिला ठार; पुरूष गंभीर जखमी

ठाणे - ठाणे शहरात एका अज्ञात वाहनाने मोटारसायकलला धडक दिल्याने एका महिलेचा मृत्यू झाला, तर एक पुरूष गंभीर जखमी झाला आहे. घोडबंदर रोडवरील विजय गार्डन हाऊसिंग सोसायटीजवळील स्कायवॉक पुलाखालून रविवारी रात्री ११.३० वाजताच्या सुमारास हा अपघात घडला. कासारवडवली पोलिस ठाण्याच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, पुरूष आणि ती महिला पार्टीवरून परतत असताना एका अज्ञात वाहनाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. महिला मागे बसलेली होती. ती अपघातग्रस्त वाहनाच्या चाकाखाली आली, तिच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने तिचा जागीच मृत्यू झाला. जखमी व्यक्तीला स्थानिक रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात हलवण्यात आला आहे. पोलीस अपघातग्रस्त वाहन आणि त्याच्या चालकाचा शोध घेत आहेत.




## 'माझ्यामुळे सामना हातून निसटला', इंग्लंडविरुद्धच्या पराभवानंतर स्मृती भावूक

आयसीसी महिला वनडे विश्वचषक २०२५ मधील २०वा सामना खूपच रोमांचक झाला. ज्यामध्ये भारताला इंग्लंडकडून अवघ्या ४ धावांनी पराभव पत्करावा लागला. विजयासाठी प्रबळ दावेदार मानल्या गेलेल्या भारतीय संघाची सामन्यावर सुरुवातीला मजबूत पकड होती, परंतु शेवटच्या षटकांमध्ये विकेट्स गमावल्याने हा सामना हातून निसटला. उपकर्णधार स्मृती मंधानाने ८८ धावांची दमदार अर्धशतकी खेळी करूनही पराभवाची जबाबदारी स्वीकारली आहे. स्मृती पराभवानंतर भावुक फोटो व्हायरल - भारतीय संघाला इंग्लंडने दिलेल्या २८९ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चांगली सुरुवात मिळाली होती. स्मृती मंधानाने एक बाजू सांभाळत ८८ धावांची शानदार खेळी केली, तर कर्णधार हरमनप्रीत कौरने ७० धावा आणि दीप्ती शर्माने ५० धावांचे योगदान दिले. मात्र, स्मृतीच्या विकेटनंतर भारतीय डावाला खिंडार पडली. कारण त्यानंतर सततच्या विकेट्सच्या पतनामुळे संघाला ४ धावांनी पराभव स्वीकारावा लागला. ज्यानंतर स्मृती भावूक झालेली दिसली, जिचा फोटो व्हायरल होत आहे.



स्मृतीच्या जिव्हारी लागला पराभव - सामन्यानंतर स्मृती मंधाना पराभवाचे खापर स्वतःवर फोडले. ती म्हणाली, आम्हाला फक्त ६ च्या सरासरीने धावा करायच्या होत्या. कदाचित आम्ही खेळ आणखी पुढे नेला असता, तर बरे झाले असते. मी या पराभवाची जबाबदारी स्वीकारते, कारण विकेट्स पडायला माझ्यापासूनच सुरुवात झाली. तिने पुढे सांगितले, मला वाटले की मी त्यांच्या गोलंदाजीचा सामना करू शकते. मी कव्हरच्या वरून मोठा फटका मारण्याचा प्रयत्न केला, पण माझ्या फटक्याचे टायमिंग चुकले. कदाचित तो फटका मी मारायला नको होता. मी आणखी संयम ठेवायला हवा होता, कारण मी संपूर्ण डावात स्वतःला संयम राखण्याचा आणि मोठे फटके टाळण्याचा सल्ला देत होते.

भारताने विश्वचषकात यापूर्वी दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध सामने गमावले असून, या पराभवाने उपांत्य फेरीच्या आशा कायम राखण्यासाठी संघाला पुढील सामन्यांमध्ये अतिशय सावध खेळ करावा लागेल. स्मृतीच्या खेळीने तिच्या फॉर्मात परतण्याचे संकेत दिले असले, तरी हा पराभव भारतीय संघासाठी धक्कादायक ठरला आहे.

हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं.१०, मनपा शॉपींग कॉम्पलेक्स, गांधी चौक, लातूर-४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास खडक हनुमान मंदिर मिलिंद नगर लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.